
# पवित्र शास्त्रातील महत्वाच्या घटनांचे सर्वेक्षण

**मुख्य घटना व काळांची प्रतिके पाठ करून पवित्र शास्त्रातील इतिहासाचा प्रवाह लक्षात घ्या:**




1. **उत्पत्ती** – उत्पत्ती 1–2. देवाने आकाश व पृथ्वी निर्माण केली; प्रत्येक गोष्ट चांगली होती; आदाम व हव्वा, ह्या पहिल्या लोकांनी देवाबरोबरच्या समाधानी सहभागितेचा आनंद लुटला.



2. **मूळचे पातक** – उत्पत्ती 3. सापाच्या रूपातील सैतान, ह्याने आदाम व हव्वा यांना मोहात पाडले, त्यांनी पातक केले आणि निर्मितीवर देवाचा शाप ओढावून घेतला.




3. **जलप्रलय** – उत्पत्ती 6:9. मनुष्यांची दुष्टाई इतकी वाढली की देवाने त्यांना पाण्यात बुडविले परंतु एका मोठ्या नौकेमध्ये नोहा व त्याच्या कुटुंबाचे रक्षण केले.




4. **बाबेलचा उंच बुरूज** – उत्पत्ती 11. मनुष्यांची संख्या वाढून ते बहुगुणित झाले आणि मोठ्या अंहकाराने गगनचुंबी बुरूज बांधण्याचा प्रयत्न केला; देवाने त्यांच्या भाषांचा घोटाळा केला आणि त्यातून अनेक राष्ट्रांचा जन्म झाला.




5. **देवाचा अब्राहामाशी करार** – उत्पत्ती 12 व 15. देव सर्व राष्ट्रांना संततीच्या द्वारे आशीर्वाद देईल ह्या त्याच्या अभिवचनावर अब्राहामाने विश्वास ठेवला.




6. **मिसरमधील गुलाम** – निर्गम 1–18. अब्राहामाचे वंशज ममी थडग्यांच्या देशात गेले; तेथे त्याची संख्या वाढली आणि दु:खदायक गुलामगिरी करावी लागली.



7. **वल्हांडणाच्या कोकऱ्याचे रक्त** – निर्गम 12–15. देवाकडून आलेल्या पिडांमुळे मिसरच्या राजाला गुलामांना मुक्त करणे भाग पडले. दारावर रक्ताचे चिन्ह नसणाऱ्या सर्व प्रथम पुत्रांना देवदूताने मारून टाकले; देवाने तांबडा समुद्र दुभागला; गुलामांची मिसरच्या सैन्यापासून सुटका झाली.



8. **इस्राएलचे नियमशास्त्र** – निर्गम 18–20. देवाने दगडी पाट्यांवर दहा आज्ञा लिहून दिल्या, नियमशास्त्राचे हे पहिले शब्द मोशेला सिनाय पर्वतावर देण्यात आले. इस्राएलाने अवज्ञा केली. देवाने त्यांना 40 वर्षे रानात भटकत ठेविले.




9. **इस्राएलाने भूमी जिंकून घेतली** – यहोशवाचे पुस्तक. देवाने अब्राहामाच्या संतानाला इस्राएलाला कनान देण्याचे अभिवचन दिले होते. ती भूमी जिंकून घेण्यासाठी इस्राएलाच्या सैन्याचे नेतृत्व यहोशवाने केले.



10. **शास्त्यांचा अंमल** – शास्ते. इस्राएलाने नियमशास्त्राचे पालन केले नाही तेव्हा देवाने मूर्तीपूजक लोकांना त्यांच्यावर अधिराज्य गाजवू दिले. त्यांनी पश्चात्ताप करून देवाच्या आज्ञा पाळल्या तेव्हा त्याने त्यांची सुटका करण्यासाठी शास्त्यांना (त्याचे नियमशास्त्र पाळणारे वीर) पाठविले.




11. **राजांचा अंमल** – 1 व 2 शमुवेल. शौल दावीद व शलमोन हे आरंभीचे राजे होते; त्यांनी इस्राएलाच्या शत्रूंचा पराभव करून राष्ट्राची भरभराट केली. देवाने दावीदाला अभिवचन दिले की त्याचा वारस सदासर्वकाळ राज्य करील.



12. **शलमोन राजाचे मंदिर** – 1 राजे. देवाने आपल्या समक्षतेने नव्या मंदिराला आशीर्वाद दिला; लोकांच्या पातकांचे क्षालन व्हावे यासाठी याजक पशूंचे रक्तार्पण करीत.




13. **दुभंगलेले राज्य** - 1 राजे 12. इस्राएलाच्या बारा वंशांनी बंड केले. 10 वंशांनी उत्तरेकडे राज्य स्थापन केले, इस्राएल. 2 वंशांनी दक्षिणेकडे राज्य स्थापन केले. यहूदा दोन्ही राज्यांनी मूर्तीपूजा केली आणि ती कमकुवत झाली.




14. **बंदिवास** - 2 राजे. 25 लोकांना इशारा देण्यासाठी देवाने संदेष्टे पाठविले. पण त्यांनी बंड केले, म्हणून देवाने परकियांना त्यांना बंदिवान करून नेऊ दिले.



15. **पुनर्रचना** - एज्रा. देवाच्या लोकांनी पश्चात्ताप केला आणि त्याने त्यांना परत आणले; त्यांनी यरूशलेमेचे तट बांधून काढले; मलाखीने ह्या काळातील जुन्या करारातील अखेरचे पुस्तक लिहिले.



16. **परकीय सत्तेचे नियंत्रण**- शतकानुशतके, पार्शीया ग्रीस सीरिया आणि रोमच्या राजांनी इस्राएलला आपले मांडलिक होण्यास आणि जबरदस्त कर भरण्यास भाग पाडले. या कालखंडात पवित्र शास्त्रातील पुस्तके लिहिली गेली नाहीत.



17. **येशूचा जन्म व जीवन - लूक.** येशूने सैतान, पाप व आजारावर मात केली; माणसे धरणारे व्हा असे त्याने आपल्या अनुयायांना सांगितले; त्याने आध्यात्मिक राज्याची सुरुवात केली आणि रोमला राजकिय नियंत्रण ठेवू दिले.




18. **वधस्तंभावरील मरण** - लूक 23. मी देवाचा पुत्र आहे असे सांगून येशू दुर्भाषण करतो म्हणून धार्मिक पुढाऱ्यांनी त्याला अटक केली; रोमन सैनिकांनी त्याला ठार मारले. तो आमच्या पातकांसाठी मेला आणि पुरला गेला.



19. **पुनरूत्थान - लूक** 24. येशू तिसऱ्या दिवशी मेलेल्यातून पुन्हा उठला; पश्चात्ताप करून त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना पुन्हा उठवून नव्या कराराचे युग सुरू करण्याचे त्याने अभिवचन दिले आहे.




20. **पवित्र आत्म्याचे आगमन** - प्रे. कृ. 2. येशू परत देवाकडे गेल्यावर त्याने आमच्यामध्ये वस्ती करण्यासाठी पवित्र आत्मा पाठविला. पेंटेकॉस्टच्या दिवशी पवित्र आत्मा मिळलेल्या विश्वासणाऱ्यांना आपआपल्या डोक्यांवर लहान लहान अग्नीच्या जिभा दिसल्या.



21. **विश्वास पसरविणे - प्रे. कृ.** पवित्र आत्म्याने परिपूर्ण विश्वासणाऱ्यांनी सुवार्तेचा प्रसार केला; येशूने सांगितल्याप्रमाणे सुवार्ता दाण्याप्रमाणे बहुगुणित झाली. या कालखंडात योहानाने पवित्र शास्त्रातील अखेरचे प्रकटीकरण हे पुस्तक लिहिले. कित्येक विश्वासणारे रक्तसाक्षी झाले.


## पवित्र शास्त्रातील सर्व पुस्तके लिहून झाल्यानंतरच्या ऐतिहासिक घटना.



22. **मंडळी व राज्य एक झाले** - (इ. स. 311). रोमन सम्राट कौन्स्टटाईनने ख्रिस्ती धर्म हा अधिकृत धर्म केला; मूर्तीपूजक लोक खऱ्या विश्वासाविनाच मंडळीत आले.



23. **ख्रिस्ती धर्मविश्वास** - खोट्या शिक्षणाचा सामना करीत विश्वासणाऱ्यांनी ते सहमत असलेल्या विश्वासासंबंधी लिहिले. प्रेषितांच्या मंतांगिकाराने मुख्य शुभवर्तमान स्पष्ट केले; नाईसिया क्रीडने म्यैकाचा सिद्धांत मान्य केला. (पिता, पुत्र व पवित्र आत्मा).



24. **रोमन साम्राज्याचा ऱ्हास** - (6 वे व 7 वे शतक). भ्रष्टाचार, फूट आणि बिघडलेली शासनव्यवस्था यामुळे साम्राज्य अंतर्गत कलहाने ढासळले; त्याचे सामर्थ्य लयाला जाऊन ते संपुष्टात आले.



25. **रोमच्या बिशपचा उदय** - रोमच्या मंडळीने सर्व मंडळ्यांच्या अधिकृत अधिकाऱ्यांवर अधिकाराचा हक्क सांगून रोमन कॅथॉलिक चर्चची स्थापना केली; या प्रकारच्या नियंत्रणाला पूर्वेकडील सनातानी मंडळ्यांनी विरोध केला.



26. **अंधार युग** (इ. स. 600-1000). शिक्षणाचा ऱ्हास झाला; लोकांनी देवाचे वचन वाचण्याचे सोडून दिले आणि त्यांच्या पुढाऱ्यांनी कृत्यांद्वारे तारण असे शिक्षण दिले; आश्रम सोडले तर यूरोपमध्ये ख्रिस्ती धर्म थंडावला परंतु आशिया खंडात मात्र तो पसरला.




27. **इस्लाम विरुद्ध धर्मयुद्ध.** युरोपियन सैन्याने मुस्लिम आक्रमकांनी जिंकून घेतलेली पवित्र भूमी (इस्राएल) आणि इतर प्रदेश पुन्हा जिंकून घेण्याचा प्रयत्न केला.




28. **प्रॉटेस्टंट चळवळ** (इ. स. 1500). मार्टीन लूथर व इतरांनी पवित्र शास्त्राचा अनुवाद सर्वसामान्यांच्या भाषेमध्ये केले, विश्वासाने तारण असे शिक्षण दिले आणि रोमन कॅथॉलिक पोपला विरोध केला.



29. **सुवार्तावादी जागृती** (1600-1700). लोकांनी येशूला आपल्या अंत:करणात घ्यावे आणि पवित्र आत्म्याला त्यांचे जीवन बदल घडवू द्यावा, तसेच त्यांनी नवा जन्म पावावे यासाठी सुवार्तिकांनी त्यांना विनंती केली.



30. **विश्वासाचा वेगाने जागतिक प्रसार** (1700 ते आजपर्यंत). मिशनऱ्यांनी ख्रिस्ती विश्वास पृथ्वीच्या बहुतेक प्रत्येक भागांमध्ये पोहंचविला.



31. **येशूच्या परत येण्याचे भाकित** - लूक 21. प्रकटीकरण स्वर्गातून आह्‌वाणी होईल; बंडखोरांना शिक्षा देण्यासाठी येशू पृथ्वीला शाप देईल. सैतानाचा नाश करून मृतांमधील काही जणांना सार्वकालिक जीवनासाठी तर इतरांना न्यायासाठी उठवील.

## ह्या प्रसंगांची उजळणी करा.

प्रतिक चिन्हे लक्षात ठेवा. त्यांची उजळणी करा. इतिहासाचा प्रवाह पाहा. प्रत्येक प्रसंग पुढच्या प्रसंगाकडे घटनेकडे कसा निर्देश करतो ते लक्षात घ्या. प्रतिक चिन्हे पाठ होईपर्यंत त्यांची उजळणी करीत राहा. संपूर्ण पवित्र शास्त्र हा एकच वृत्तांत असल्याचे तुमच्या लक्षात येईल. इतिहासाचा हा सारांश तुम्ही ज्यांना शिकविता त्यांच्याही लक्षात राहावा यासाठी त्यांना मदत करा.

पुढे काही गोष्टींची यादी दिली आहे; त्याच्याशी निगडीत घटना तुम्हाला आठवली म्हणजे त्यापुढे खूण करा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. सूर्य चंद्र | 8. दगडी पाटी | 15. विध्वंस झालेले शहर | 22. तरवार, पवित्र शास्त्र | 29. येशूचे हृदय |
| 2. सर्प | 9. तरवार | 16. चाबूक | 23. गुंडाळी व लेखणी | 30. पृथ्वीचा गोल |
| 3. मोठे जहाज | 10. गुंडाळी, तरवार | 17. मासा | 24. मोडलेली तरवार | 31. तुतारी |
| 4. उंच बुरूज | 11. मुगुट | 18. वधस्तंभ | 25. बिशपची टोपी | |
| 5. हस्तांदोलन | 12. मोठे ठोकळे | 19. रिकामी कबर | 26. न पेटविलेली मेणबत्ती | |
| 6. पिरॅमिडस् | 13. दुभंगलेला मुगुट | 20. ज्वाळा | 27. घोडेस्वार | |
| 7. रक्त, दार | 14. बेड्या | 21. बी पेरणे | 28. उघडे पवित्र शास्त्र | |

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net